THE

# Bombay Government Gazette.

**Published by Authority.**

THURSDAY, 8TH AUGUST 1895.

*Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

### हाजी नेणाऱ्या तारवांबाबदच्या आक्टाचा मसुदा.

अनुक्रमणिका.

कलमें.

**प्रथमारंभींचे ठराव.**

१. सरनामा.

२. कोठें व कोणाकोणाला लागू आहे.

३. सुरुवात.

४. सन १८८७ चा आक्ट १० याचा हाजी नेणाऱ्या तारवांशीं संबंध असेल तेथवर तो आक्ट रद्द केला असे.

५. व्याख्या.

**हाजी नेणाऱ्या तारवांच्या सफरींबाबद नियम.**

६. सरकारानें नेमलेल्या जागांपासून मात्र हाजी नेणारीं तारवें हकारणें.

७. हकारण्याच्या वेळाची सूचना देणें.

८. हाजी नेणाऱ्या तारवावर जाऊन त्याची पाहणी करण्याचा अधिकार.

कलमें.

९. दोन दाखले असल्यावांचून हाजी नेणारीं तारवें हकारूं नये.

१०. दाखला अ यांतील मजकूर.

११. दाखला ब यांतील मजकूर.

१२. दाखले देणें.

१३. दाखला अ याच्याबदला दुसरा.

१४. हाजी नेणाऱ्या तारवाची तपासणी.

१५. मजरेस येईल त्याप्रमाणें दाखला देणें.

१६. दाखल्यांची नकल प्रदर्शित करणें.

१७. हाजींनीं आपलें स्वतःचें खुराकी सामान घेतलें असलें तर.

१८. हाजींकरितां जागेची व इसपितळाची तजवीज करणें.

१९. हाजींबाबद पत्रकें.

कलमें.

२०. सफरींत घडलेल्या मृत्यूंबाबद.

२१. हाजी नेणाऱ्या तारवानें दर्म्यानच्या जागीं जास्त हाजी घेतले तर.

२२. हाजी नेणारीं तारवें मुख्यत्वेंकरून वाफेच्या योगानें चालविणें.

२३. हाजी नेणाऱ्या किल्येक तारवांवर वैद्यकीय अमलदार असणें.

२४. हाजी नेणाऱ्या तारवांनीं जाल्या सफरींत आदनास लागणें.

२५. आदन येथें बिल आफ् हेल्थ यात्रयाचें त्याबाबद.

२६. हाजी नेणारें तारूं जाल्या सफरीवर जाईल त्या प्रसंगीं खत लिहून देणें.

२७. हाजींच्या वैद्यकीय तपासणीसंबंधीं स्थानिक सरकारचा अधिकार.

२८. आरोग्यरक्षणासंबंधी कर हाजी नेणाऱ्या तारवाच्या मास्तरानें देणें.

### शिक्षा.

२९. हाजी नेणारें तारूं गैरकायदेशीर रीतीनें निघाल्याबद्दल किंवा त्यानें त्याप्रमाणें हाजी घेतल्याबद्दल मास्तरास किंवा मालकास शिक्षा.

३०. हाजी नेणाऱ्या तारवावर जाण्यास किंवा त्याची पाहणी करण्यास हरकत करण्याबद्दल शिक्षा.

३१. दाखल्यांची नकल प्रदर्शित न केल्याबद्दल मास्तरास किंवा मालकास शिक्षा.

३२. हाजींसंबंधी पत्रकांबाबद फर्मावल्याप्रमाणें न केल्याबद्दल व दुसऱ्या किल्येक गोष्टींबद्दल मास्तरास शिक्षा.

३३. दाखला घेतल्यावर हाजी नेणाऱ्या तारवांत कपटानें फेरफार केल्याबद्दल मास्तरास शिक्षा.

३४. ठरविलेलें खुराकी सामान हाजींस देण्यास चुकल्याबद्दल मास्तरास शिक्षा.

कलमें.

३५. ठरविलेल्या संख्येहून जास्त हाजी नेण्याबद्दल मास्तरास व मालकास शिक्षा.

३६. हाजीनें ज्या जागीं उतरण्याचा करार केला असेल त्याखेरीज इतर जागीं त्याला उतरण्याबद्दल मास्तरास शिक्षा.

३७. हाजींबरोबर केलेल्या कराराविरुद्ध सफर करण्याबद्दल मास्तरास व मालकास शिक्षा.

३८. मुख्यत्वेंकरून वाफेच्या योगानें न चालविलेल्या हाजी नेणाऱ्या तारवाच्या मास्तरास व मालकास शिक्षा.

३९. एका किंवा अधिक वैद्यकीय अमलदारांवांचून २३ व्या कलमाविरुद्ध हाजी नेणारें तारूं हकारिल्याबद्दल मास्तरास शिक्षा.

४०. जात्या सफरींत आदन येथें बिल आफ् हेल्थ न घेतल्याबद्दल मास्तरास शिक्षा.

४१. कलम २७ विरुद्ध हाजी किंवा संपर्कानें दूषित झालेली जिन्नस घेणाऱ्या मास्तरास शिक्षा.

४२. हाजी नेणाऱ्या तारवाचा मास्तर किंवा वैद्यकीय अमलदार यास या आक्टाअन्वयें केलेल्या कानू न पाळण्याबद्दल शिक्षा.

### काम चालविण्याची रीति.

४३. अपराध ठरविणें, व हाजी नेणारें तारूं जप्त करून दंड वसूल करणें.

४४. हुकूमत.

४५. शिक्षा होण्याबद्दल काम चालविण्याला अधिकार.

४६. दंडांचा विनियोग.

४७. गैरहजर साक्षीदारांच्या जबान्या.

### पुरवणी ठराव.

४८. हाजी तारवावर चढल्याच्या व ते तारवावरून उतरण्याच्या बंदरांस माहिती पाठविणें.

४९. कान्सलचा रिपोर्ट.

५०. गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल व स्थानिक सरकारें यांस कानू करण्याचा अधिकार.

५१. अमलदारांची नेमणूक.

## हाजी नेणाऱ्या तारवांच्या नियमनाकरितां विशेष चांगला बंदोबस्त करण्याबाबदच्या आक्टाचा मसुदा.

ज्याअर्थी हाजी नेणाऱ्या तारवांच्या नियमनाकरितां विशेष चांगला बंदोबस्त करणें योग्य आहे, त्याअर्थी यावरून पुढीलप्रमाणें ठरविण्यांत येत आहेः—

### प्रथमारंभींचे ठराव.

१. ह्या आक्टास, सन १८९१ चा हाजी नेणाऱ्या तारवांबाबद आक्ट, असें ह्मणावें. सरनामा.

२. (१) तो सगळ्या ब्रिटिश हिंदुस्थानास, आणि— कोठें व कोणाकोणाला लागू आहे.

(अ) मलिका माआझमांची जी रयत, मलिका माआझमांच्या सार्वभौम सत्तेखालीं असणाऱ्या हिंदुस्थानांतील राजांच्या व संस्थानांच्या राज्यांत असेल त्या सर्व रयतेस;

(ब) मलिका माआझमांची जी हिंदुस्थानांतील देशी रयत ब्रिटिश हिंदुस्थानाच्या बाहेर व पलीकडे असेल त्या सर्व रयतेस; आणि

(क) पोट-कलम (२) यांत सांगितलेल्या अपवादांस पात्र राहून, यांत पुढें हाजी नेणाऱ्या तारवाची व्याख्या केली आहे तशा दरेक तारवास,

लागू आहे.

(२) परंतु तो—

(१) बादशाही आरमाराच्या किंवा मलिका माआझमांच्या इंडियन मरीन सर्व्हिसच्या कोणत्याही लढाऊ तारवास, ट्रूपशिपास [लष्कर नेणाऱ्या तारवास], ट्रान्स्पोर्टास [मनुष्यें व सामान, सरंजाम वगैरे नेणाऱ्या तारवास] किंवा दुसऱ्या तारवास, किंवा

(२) मलिका माआझमांच्या नौकरींत त्या त्या वेळीं असणाऱ्या दुसऱ्या कोणत्याही तारवास, किंवा

(३) कोणत्याही परराजाच्या किंवा परसंस्थानाच्या कोणत्याही लढाऊ तारवास, किंवा

(४) हाजी नेणारें तारूं नसणाऱ्या कोणत्याही तारवास,

लागू होत नाहीं.

३. हा आक्ट, तारीख पहिली माहे अक्टोबर सन १८९१ रोजीं अमलांत येईल. सुरुवात.

४. सदरहू तारखे रोजीं व त्या तारखेपासून सन १८८७ चा देशी उतारू नेणाऱ्या तारवांबाबद आक्ट, यांतील कोणताही मजकूर हाजी नेणाऱ्या कोणत्याही तारवास लागू होणार नाहीं. सन १८८७ चा आक्ट १० याचा हाजी नेणाऱ्या तारवांशीं संबंध असेल तेथवर तो आक्ट रद्द केला असे.

५. या आक्टांत, विषयास अगर संदर्भास बाध येत नसेल तर,— व्याख्या.

(१) "हाजी" या शब्दाचा अर्थ, हेजाझला जाणारा किंवा तेथून परत येणारा मुसलमान उतारू, असा समजावा.

(२) "हाजी नेणारें तारूं" या संज्ञेचा अर्थ, ब्रिटिश हिंदुस्थानांतील कोणत्याही बंदरापासून तांबड्या समुद्रामधील कोणत्याही बंदरास किंवा तांबड्या समुद्रांतील कोणत्याही बंदरापासून ब्रिटिश हिंदुस्थानांतील कोणत्याही बंदरास हाजी नेणाआणणारें तारूं, असा समजावा:

मात्र असें ठरविण्यांत येतें कीं, जें कोणतेंही तारूं अगदीं खालच्या वर्गाच्या हाजींखेरीज इतर उतारू नेत असेल व ज्यावर त्याच्या एकंदर बारदानापैकीं दर शंभर टनास एका हाजीहून कमी प्रमाणानें अगदीं खालच्या वर्गाचे हाजी असतील, तें तारूं या आक्टाच्या अर्थाप्रमाणें हाजी नेणारें तारूं आहे असें समजूं नये.

**खुलासा.**—"अगदीं खालच्या वर्गाचे हाजी" ह्मणजे जे हाजी हलक्या वर्गाच्या उतारूंकरितां असणाऱ्या जागेंतून जात असतील ते हाजी :

(३) "सफर" या शब्दाचा अर्थ, हाजी नेणाऱ्या तारवाचें निघण्याचें बंदर किंवा जागा व त्याचें अखेर जावयाचें बंदर किंवा जागा यांच्या दर्म्यानचें सगळें अंतर, असा समजावा :

(४) "**कस्टमचा मुख्य अमलदार**" या संज्ञेचा अर्थ, ज्या बंदरास किंवा जागेस हा **आक्ट** लागू आहे तशा कोणत्याही बंदरांतील किंवा जागेंतील जलमार्गाच्या कस्टमचा मुख्य कारभार चालविणारा अमलदार, असा समजावा : आणि

(५) "**माजिस्ट्रेट**" या शब्दाचा अर्थ, जो मनुष्य दुसऱ्या वर्गाच्या **मा**जिस्ट्रेटाच्या अधिकारांहून कमी दर्जाचे नसणारे अधिकार चालवीत असेल तसा मनुष्य, असा समजावा.

## हाजी नेणाऱ्या तारवांच्या सफरींबाबद नियम.

**सरकारानें नेमलेल्या जागांपासून मात्र हाजी नेणारीं तारवें हकारणें.**

६. (१) हाजी नेणाऱ्या कोणत्याही तारवानें निघण्यासाठीं किंवा जाण्यासाठीं **स्थानिक सरकार ब्रिटिश हिंदुस्थानांत** जें बंदर किंवा जागा नेमील त्याखेरीज इतर कोणत्याही बंदराहून किंवा जागेहून त्या तारवानें निघतां किंवा जातां कामा नये, किंवा तेथें उतारू (मग ते हाजी असोत किंवा नसोत) उतरतां कामा नये.

(२) सदरहूप्रमाणें नेमलेल्या बंदराहून किंवा जागेहून हाजी नेणारें तारूं सफरीवर निघाल्यानंतर किंवा गेल्यानंतर, त्या तारवावर कोणत्याही मनुष्यास, सदरहूप्रमाणें नेमलेल्या इतर कोणत्या तरी बंदराखेरीज किंवा जागेखेरीज हाजीदाखल घेतां कामा नये.

**हकारण्याच्या वेळाची सूचना देणें.**

७. (१) हाजी नेणारें तारूं सदरहूप्रमाणें निघेल किंवा जाईल त्याच्या मास्तरानें, मालकानें किंवा एजंटानें, अशा तारवांतून हाजी जावयाचे असल्याबद्दल आणि त्याची अखेर जाण्याची जागा व हकारण्याची योजलेली वेळ यांबद्दल, **स्थानिक सरकारानें** त्याबाबद नेमलेल्या अमलदारास सूचना दिली पाहिजे.

(२) सदरहू सूचना सदरहू वेळापूर्वीं निदान तीन दिवस अगोर दिली पाहिजे.

**हाजी नेणाऱ्या तारवावर जाऊन त्याची पाहणी करण्याचा अधिकार.**

८. सदरहू सूचना पोहंचल्यावर सदरहू अमलदारास किंवा त्यानें अखत्यार दिलेल्या मनुष्यास, त्या तारवावर जाण्याची, आणि तें तारूं, त्यावरील सोई, खुराकी सामान व सामग्री यांची पहाणी करण्याची कोणत्याही वेळीं मोकळीक आहे.

**दोन दाखले असल्यावांचून हाजी नेणारें तारूं हकारूं नये.**

९. (१) हाजी नेणाऱ्या कोणत्याही तारवानें, पुढील लगतच्या दोन कलमांत सांगितलेल्या मजकुराचे दोन दाखले त्याच्या मास्तराजवळ असल्यावांचून, या आक्टाअन्वयें नेमलेल्या कोणत्याही बंदराहून किंवा जागेहून सफर सुरू करतां कामा नये.

(२) पोर्ट-क्लियरन्स देण्याचें ज्या अमलदाराचें काम असेल त्यानें तें मास्तराजवळ सदरहू दाखले असल्यावांचून देतां कामा नये.

**दाखला अ यांतील मजकूर.**

१०. सदरहू दाखल्यांपैकीं पहिला दाखला (ज्यास या आक्टांत पुढें "दाखला अ" असें ह्मटलें आहे) यांत, तारूं जौळी आहे आणि त्यावर असावीं तितकीं मनुष्यें, सरंजाम, सोई व वारा खेळण्याचें साधन हीं आहेत असा मजकूर, व तें जितके हाजी नेण्यालायक असेल त्यांची संख्या, हीं लिहिलेलीं असलीं पाहिजेत.

११. सदरहू दाखल्यांपैकीं दुसरा दाखला (ज्यास या आक्टांत पुढें "दाखला ब" असें ह्मटलें आहे) यांत पुढील मजकूर लिहिलेला असला पाहिजे, ह्मणजे— दाखला ब यांतील मजकूर.

(अ) तारूं जी सफर करणार असेल ती, आणि दर्म्यानच्या कोणत्याही बंदरांस तें लागण्याचें असल्यास तीं बंदरें;

(ब) त्यावर असावे तितके अमलदार व खलाशी आहेत;

(क) तारवाच्या नोकर लोकांकरितां जरूर आहे त्याहून जास्त खुराकी सामान, सर्पण व निर्मळ पाणी, आणि या आक्टाअन्वयें केलेल्या कानूंमध्यें हाजी नेणाऱ्या तारवांसाठीं इतर कांहीं वस्तु सांगितलेल्या असल्यास त्या, हीं तारवावर घेतलेलीं आहेत, आणि तीं सदरहू कानूंत सांगितल्या प्रतीचीं असून योग्य रीतीनें ठ्याक केलेलीं आहेत, आणि अशा तारवास जी सफर करणें असेल तिच्या मुदतींत (क्वारंटीनमध्यें कांहीं खोळंबा होण्याचा अजमास दिसत असल्यास तो धरून) तारवावरील हाजींस, सदरील कानूंमध्यें जें मान त्या त्या वेळीं सांगितलें असेल त्या मानाप्रमाणें पुरण्यापुरतीं आहेत;

(ड) मास्तराजवळ दाखला अ हा आहे;

(इ) असें तारूं मुख्यत्वेंकरून वाफेच्या योगानें चालविलें जात आहे;

(फ) जर तें तारूं शंभरांहून जास्त हाजी नेणार असेल तर, २३ व्या कलमांत सांगितल्याप्रमाणें, या आक्टाअन्वयें केलेल्या कानूंवरहुकूम लैसेन्स मिळालेला एक किंवा अधिक वैद्यकीय अमलदार त्यावर घेतले आहेत; आणि

(ग) या आक्टाअन्वयें केलेल्या कानूंत इतर कांहीं तपशील सांगितलेला असल्यास तो,—

येणेंप्रमाणें मजकूर लिहिलेला असला पाहिजे.

१२. दाखला अ व दाखला ब हे, ७ व्या कलमाअन्वयें नेमलेल्या अमलदारानें दिले पाहिजेत असें समजावें. दाखले देणें.

१३. ज्या प्रसंगीं हाजी नेणाऱ्या तारवाचा मास्तर सदरहू अमलदाराकडे, खालीं लिहिलेल्या दाखल्यांपैकीं कोणताही एक, ह्मणजे,— दाखला अ याच्याबदल दुसरा.

(अ) बोर्ड आफ् ट्रेड यानें किंवा एकाद्या ब्रिटिश कालनीच्या सरकारानें दिलेला व्यवहारोपयोगी दाखला, किंवा

(ब) तारूं हकारण्याचा दिवस योजला असेल त्या दिवसापूर्वींच्या एका वर्षाच्या आंतील तारखेस ब्रिटिश हिंदुस्थानच्या एकाद्या सरकाराच्या हुकुमाअन्वयें दिलेला, अमलांत असणारा आणि ज्या सफरीवर तारूं जावयाचें असेल त्या सफरीस किंवा ज्या कामावर तें लावलें जाण्याच्या बेतांत असेल त्या कामास लागू असणारा दाखला,

हजर करील, त्या प्रसंगीं, १० व्या कलमाअन्वयें जो तपशील असणें अवश्य आहे तो तपशील त्या दाखल्यांत लिहिलेला असला तर, तो दाखला सदरहू प्रकारच्या तपशिलाच्या पुराव्यादाखल घेण्याचा सदरहू अमलदारास अधिकार आहे, आणि तो दाखला मग या आक्टाच्या कारणांसाठीं दाखला अ आहे असें समजलें पाहिजे.

हाजी नेणाऱ्या तारवाची तपासणी.

१४. (१) कलम ७ यांत सांगितलेली सूचना पोहंचल्यावर, त्या कलमाअन्वयें नेमलेल्या अमलदारास, त्याला योग्य वाटेल तर, लायक सर्व्हेयरांकडून मास्तराच्या किंवा मालकाच्या खर्चानें तारवाची तपासणी करविण्याचा अधिकार आहे, आणि या सर्व्हेयरांनीं, आपल्या मतें, तें तारूं हाजी नेण्याजोगें जौळीं आहे किंवा कसें आणि त्या कारणाकरितां त्यावर असावीं तितकीं मनुष्यें, सरंजाम, सोई व वारा खेळण्याचें साधन हीं आहेत किंवा कसें याविषयीं त्या अमलदारास रिपोर्ट केला पाहिजे:

मात्र असें ठरविण्यांत येतें कीं, हाजी नेणाऱ्या ज्या तारवापाशीं १३ ज्या कलमाच्या (अ) रकमेंत किंवा (ब) रकमेंत सांगितलेला दाखला असेल त्याची तपासणी करणें असल्यास ती त्यानें, तें तारूं जायां झाल्याच्या किंवा त्यांत फेरबदल झाल्याच्या कारणानें किंवा इतर कांहीं वाजवी सबबीमुळें हाजी नेण्याजोगें जौळी नाहीं किंवा त्या कारणासाठीं त्याजवर असावीं तितकीं मनुष्यें, सरंजाम, सोई किंवा वारा खेळण्याचें साधन नाहीं असें आढळून येण्याचा संभव आहे असें त्यास वाटल्याखेरीज करवूं नये.

(२) हाजी नेणाऱ्या ज्या तारवापाशीं सदरहू प्रकारचा कोणताही दाखला असेल त्याची सदरहू अमलदार जर तपासणी करवील, आणि सर्व्हेयर जर असा रिपोर्ट करतील कीं, तें तारूं हाजी नेण्याजोगें जौळी आहे व त्याजवर या कारणासाठीं असावीं तितकीं मनुष्यें, सरंजाम, सोई व वारा खेळण्याचें साधन हीं आहेत, आणि तें अशा कामाजोगें जौळी नाहीं किंवा त्या कारणासाठीं त्यावर असावीं तितकीं मनुष्यें, सरंजाम, सोई किंवा वारा खेळण्याचें साधन नाहीं असें आढळून येण्याचा संभव आहे असें सदरहू अमलदारास वाटण्याची वाजवी सबब नव्हती, तर अशा तपासणीचा खर्च स्थानिक सरकारानें दिला पाहिजे.

नजरेस येईल त्याप्रमाणें दाखला देणें.

१५. (१) हाजी नेणाऱ्या तारवाबाबद या आक्टाअन्वयें दाखला देण्याचा अधिकार ज्या अमलदारास दिला असेल त्यानें असा दाखला, तारवावरील हाजींच्या आरोग्यास किंवा सुरक्षितपणास बाध येण्यासारखा आहे अशा प्रतीचा, इतक्या परिमाणाचा किंवा अशा रीतीनें भरून ठेवलेला कोणताही माल तारवावर नाहीं अशी आपली खात्री झाल्यावांचून, देतां कामा नये.

(२) परंतु वर ठराव केला आहे तो खेरीज करून, व पोट-कलम (३) यांतील ठरावांस पात्र राहून, या आक्टाअन्वयें द्यावयाचा दाखला देणें न देणें हें सदरहू अमलदाराच्या नजरेवर आहे.

(३) सदरहू प्रकारची नजर सदरहू अमलदार चालवील त्या कामीं तो, स्थानिक सरकारच्या आणि तें सरकार आपल्या व त्या अमलदाराच्या दर्म्यान कोणताही अधिकारी त्यासाठीं नेमील त्या अधिकाऱ्याच्या निबंधाखालीं राहील.

दाखल्यांची नकल प्रदर्शित करणें.

१६ हाजी नेणाऱ्या दरेक तारवाच्या मास्तरानें किंवा मालकानें अशा तारवाबाबद या आक्टाअन्वयें दिलेल्या दाखल्यांपैकीं प्रत्येक दाखल्याची एकेक नकल त्या तारवावरील मनुष्यांस दिसे अशा रीतीनें त्या तारवाच्या एकाद्या प्रसिद्ध भागीं लावली पाहिजे, व ती सफरीच्या सर्व मुदतींत त्याप्रमाणें लावलेली ठेविली पाहिजे.

हाजींनीं आपलें स्वतःचें खुराकी सामान घेतलें असलें तर.

१७. या आक्टाअन्वयें केलेल्या कानूंमध्यें त्या त्या वेळीं ज्या प्रतीचें व जितकें खुराकी सामान सांगितलें असेल, त्या प्रतीचें व तितकें, एकाद्या हाजी नेणाऱ्या तारवावर कोणत्याही हाजीनें आपल्या स्वतःच्या उपयोगाकरितां घेतलें आहे अशी, त्या कामासाठीं स्थानिक सरकारानें नेमलेल्या अमलदाराची खात्री होईल तर, हाजी लोकांसाठीं खुराकी सामानाचा पुरवठा करण्याबद्दलचे या आक्टांतील ठराव, त्या हाजीसाठीं खुराकी सामानाचा पुरवठा करण्याच्या संबंधापुरते लागू होणार नाहींत.

हाजींकरितां जागेची व इसापितळाची तजवीज करणें.

१८. (१) गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांस, हाजी नेणाऱ्या तारवांमध्यें हाजींकरितां मधल्या डेकांवर (उतारू नेणाऱ्या तारवांच्या नियमनाबाबदच्या कोणत्याही आक्टाअन्वयें त्या त्या वेळीं उतारूंकरितां ठरविलेल्या जागेहून कमी नाहीं अशी) किती चौरस व किती घन फूट जागा असली पाहिजे तें हुकूम फर्मावून ठरविण्याचा अधिकार आहे.

(२) हाजी नेणाऱ्या दरेक तारवांत त्यावरील हाजींला दिवसास व रात्रीं मोफत वापरण्याकरितां, (पहिल्या व दुसऱ्या वर्गाच्या उतारूंकरितां निराळा ठेवलेला भाग, तारवाच्या नोकरलोकांकरितां ठेवलेली हवा घेण्याची जागा व उतारूंकरितां इसपितळादाखल जी जागा राखून ठेवण्यांत येईल ती हीं खेरीज करून) वरचा डेक राखून ठेवलेला असला पाहिजे.

(३) पोट-कलमें (१) व (२) यांत सांगितलेल्या जागेखेरीज आणखी, हाजी नेणाऱ्या दरेक तारवांत, त्यावर चढलेल्या हाजींपैकीं दर शेंकडा पांच असामींची, प्रत्येकीं बत्तीस चौरस फूट जागा मिळून, सोई होण्याजोगें इसपितळ असलें पाहिजे.

हाजींबाबद पत्रकें.

१९. ब्रिटिश हिंदुस्थानांतील कोणत्याही बंदराहून किंवा जागेहून निघणाऱ्या किंवा जाणाऱ्या हाजी नेणाऱ्या दरेक तारवाच्या मास्तरानें,तारवावर चढलेल्या सर्व हाजींची संख्या, त्यांमध्यें पुरुष किती व स्त्रिया किती आहेत तें, व तारवाच्या नौकर लोकांची संख्या ह्या निर्दिष्ट करून दोन पत्रकें केलीं पाहिजेत व त्यांवर सही करून, तीं कलम ७ अन्वयें नेमलेल्या अमलदाराकडे दिलीं पाहिजेत. मग त्या अमलदारानें त्या संख्या बरोबर असल्याबद्दल प्रथम आपली खात्री करून घेतली पाहिजे, व नंतर सदरहू पत्रकांपैकीं एकावर आपली मखलसी करून तें मास्तरास परत दिलें पाहिजे.

सफरींत घडलेल्या मृत्यूबाबद.

२०. हाजी नेणाऱ्या दरेक तारवाच्या मास्तरानें, आपणास परत दिलेल्या पत्रकांत, व पुढल्या लगतच्या कलमाअन्वयें करावयाच्या कोणत्याही पुरवणी पत्रकांत, सफरींत कोणी हाजी मरण पावला असल्यास त्याच्या मरणाची तारीख व मरणाचें जें कारण वाटत असेल तें हीं लिहून ठेविलीं पाहिजेत, आणि ज्या बंदरीं किंवा जागीं असें तारूं शेवटीं जाण्याचें असेल त्या बंदरीं किंवा जागीं किंवा ज्या कोणत्याही बंदरीं किंवा जागीं हाजी जमिनीवर उतरण्याचें योजिलें असेल त्या बंदरीं किंवा जागीं तें पोहंचेल तेव्हां, आणि कोणतेही हाजी तारवावरून उतरण्यापूर्वी, तें पत्रक, त्याला ज्या कोणत्याही पुरवण्या जोडल्या असतील त्यांसुद्धां, त्यानें, त्या बंदरीं किंवा जागीं मलिका माआझमांच्या वतीनें कान्सलचा अधिकार जो कोणताही मनुष्य कायदेशीर रीतीनें चालवीत असेल त्याकडे किंवा त्या ठिकाणच्या कस्टमच्या मुख्य अमलदाराकडे, किंवा तेथें ७ व्या कलमाअन्वयें अमलदार नेमलेला असल्यास त्याकडे हजर केलें पाहिजे.

हाजी नेणाऱ्या तारवानें दर्म्यानच्या जागीं जास्त हाजी घेतले तर.

२१. (१) पुढील दोन्हींतून कोणत्याही बाबतींत, ह्मणजे,—

(अ) जर हाजी नेणारें तारूं सफरीवर निघाल्यानंतर किंवा गेल्यानंतर कोणतेही जास्त हाजी, तारवावर हाजी चढविण्यासाठीं या आक्टाअन्वयें नेमलेल्या ब्रिटिश हिंदुस्थानांतील कोणत्याही बंदरीं किंवा जागीं तारवावर घेण्यांत आले तर, किंवा

(ब) हाजी नेणारें तारूं ब्रिटिश हिंदुस्थानापलीकडील कोणत्याही जागीं जास्त हाजी अगोदर घेऊन, आपल्या सफरींत सदरहू प्रकारच्या कोणत्याही बंदरीं किंवा जागीं लागेल किंवा येईल तर,

त्या बंदरीं किंवा जागीं ७ व्या कलमाअन्वयें नेमलेल्या अमलदाराकडून मास्तरानें, दाखला व सारखा एक नवीन दाखला घेतला पाहिजे, आणि जास्त घेतलेल्या सर्व हा-

जींची संख्या व त्यांमध्यें पुरुष किती व स्त्रिया किती आहेत तें निर्दिष्ट करून पुरवणी पत्रकें केलीं पाहिजेत.

(२) दाखला व व हाजींबावदचीं पत्रकें यांसंबंधीं या आक्टांत मागें जे ठराव सांगितले आहेत ते सर्व या कलमाअन्वयें दिलेल्या कोणत्याही दाखल्यास किंवा केलेल्या कोणत्याही पत्रकास लागू होतील.

हाजी नेणारीं तारवें मुख्यत्वेंकरून वाफेच्या योगानें चालविणें.

२२ हाजी नेणारें दरेक तारूं मुख्यत्वेंकरून वाफेच्या योगानें चालविलें पाहिजे.

हाजी नेणाऱ्या कित्येक तारवांवर वैद्यकीय अमलदार असणें.

२३. शंभरांहून जास्त हाजी नेणाऱ्या दरेक तारवावर, या आक्टाअन्वयें केलेल्या कानूंप्रमाणें लैसेन्स मिळालेला एक वैद्यकीय अमलदार असला पाहिजे, आणि नेलेल्या हाजींची संख्या एक हजारांहून जास्त असेल, तर सदरीलप्रमाणें लैसेन्स मिळालेला दुसरा एक वैद्यकीय अमलदार असला पाहिजे.

हाजी नेणाऱ्या तारवांनीं जात्या सफरींत आदनास लागणें.

२४. (१) आदन खेरीज करून ब्रिटिश हिंदुस्थानांतील कोणत्याही बंदराहून तांबड्या समुद्रामधील कोणत्याही बंदरास हाजी घेऊन जाणाऱ्या दरेक तारवानें आदन येथें लागलें पाहिजे, व त्यानें योग्य अधिकाऱ्याकडून *क्लीन बिल आफ् हेल्थ घेतल्यावांचून तें बंदर सोडतां कामा नये.

(२) तांबड्या समुद्रामधील कोणत्याही बंदराहून ब्रिटिश हिंदुस्थानांतील आदन खेरीज करून कोणत्याही बंदरास हाजी घेऊन जाणाऱ्या तारवानें आदन येथें लागणें अवश्य नाहीं, किंवा, तें त्या बंदरीं लागल्यास, तें बंदर सोडण्यापूर्वीं त्यानें क्लीन बिल आफ् हेल्थ घेण्याची जरुरी नाहीं.

आदन येथें बिल आफ् हेल्थ द्यावयाचें त्याबाबद.

२५. सदरहू बिल आफ् हेल्थ देण्याचा अधिकार आदन येथें ज्या अधिकाऱ्यास दिलेला असेल त्यानें, या आक्टावरून किंवा या आक्टाच्या आधारें ठरविलेल्या संख्येहून जास्त हाजी तारवावर असतील तर असें बिल देतां कामा नये, आणि हाजी नेणाऱ्या तारवावर या आक्टाअन्वयें केलेल्या कोणत्याही कानूंत सांगितल्याप्रमाणें वहिवाट झाली नसली, तर त्याला वाटेल तर तें देण्याचें नाकारण्याचा अधिकार आहे.

हाजी नेणारें तारूं जात्या सफरीवर जाईल त्या प्रसंगीं खत लिहून देणें.

२६. आदन खेरीज करून ब्रिटिश हिंदुस्थानांतील कोणत्याही बंदराहून तांबड्या समुद्रामधील कोणत्याही बंदरास हाजी घेऊन जाणाऱ्या दरेक तारवाच्या बाबतींत, पोर्ट-क्लियरन्स देण्याचें ज्या अमलदाराचें काम असेल त्यानें, त्या तारवाचा मास्तर, मालक किंवा एजंट व ब्रिटिश हिंदुस्थानांत राहणारे दोन जामीन यांनीं सेक्रेटरी आफ् स्टेट फार इंडिया इन् कौन्सिल यांच्या नांवीं खालीं लिहिलेल्या शर्तींचें पांच हजार रुपयांच्या रकमेचें समायिक व प्रत्येकाच्या जबाबदारीचें खत लिहून दिल्यावांचून किंवा दिलें जाई तोंपर्यंत पोर्ट-क्लियरन्स देतां कामा नये. सदरहू शर्ती येणेंप्रमाणें:—

(अ) सदरहू तारूं जात्या सफरींत आदनास लागेल व तेथें क्लीन बिल आफ् हेल्थ घेईल, आणि

(ब) सदरहू तारवाचा मास्तर व असल्यास वैद्यकीय अमलदार हे, या आक्टाच्या ठरावांप्रमाणें, आणि हाजी नेणाऱ्या तारवांबाबद गव्हर्नर-जनरल इन् कौन्सिल हे या आक्टाअन्वयें करतील तशा कानूंच्या ठरावांप्रमाणें वागतील.

हाजींच्या वैद्यकीय तपासणीसंबंधीं स्थानिक सरकारचा अधिकार.

२७. हाजी नेणाऱ्या कोणत्याही तारवावर कोणताही हाजी, तो, हाजी तपासण्यासाठीं स्थानिक सरकार नेमील तशा वैद्यकीय अमलदाराकडून, तें सरकार त्या बाबतींत ठर-

---

* आरोग्य चांगलें असल्याबद्दल दाखला.

वील तशा वेळीं व जागीं व तशा रीतीनें, तपासला गेल्यावांचून व तपासण्यांत येई तोंपर्यंत घेतां कामा नये.

(२) जर या कलमाअन्वयें तपासणी करणाऱ्या अमलदारास, एकाद्या हाजीला पटकीचा वाखा किंवा पटकीच्या स्वरूपाचा विकार, किंवा अंदेशा येण्यासारखा हगवणीचा कोणताही उपद्रव झालेला आहे असें किंवा कोणताही भयंकर प्रकारचा सांक्रामिक किंवा स्पर्शजन्य रोग झालेला आहे असें वाटेल, तर अशा हाजीस तारवावर चढण्याची परवानगी देतां कामा नये.

(३) जर, अमुक एक हाजीला कोणताही भयंकर प्रकारचा सांक्रामिक किंवा स्पर्शजन्य रोग झालेला नाहीं तरी तसा रोग झालेल्या कोणत्याही मनुष्याच्या तो तैनातींत आहे किंवा नुकताच होता किंवा इतर रीतीनें त्याचा तशा मनुष्याशीं संसर्ग आहे किंवा नुकताच होता असें वाटण्यास सदरहू प्रकारच्या कोणत्याही अमलदारास कारण असेल, तर आपणास योग्य वाटेल तशा मुदतीपर्यंत त्या हाजीस त्या तारवावर चढण्याची मनाई करण्याचा त्या अमलदारास अख्त्यार आहे.

(४) पटकीचा वाखा किंवा पटकीच्या स्वरूपाचा विकार, किंवा भयंकर प्रकारचा कोणताही सांक्रामिक किंवा स्पर्शजन्य रोग झालेल्या मनुष्यांच्या संपर्कानें ज्या जिनस दूषित झाल्या असतील, किंवा ज्या याप्रमाणें दूषित झाल्याविषयीं अंदेशा येत असेल, त्या सर्व जिनसा, हाजी नेण्याऱ्या तारवावर घेतल्या जाण्यापूर्वीं, स्थानिक सरकारानें त्या कारणासाठीं नेमलेल्या वैद्यकीय अमलदाराच्या देखरेखीखालीं, असें सरकार जी रीत फर्मावील त्या रीतीनें शुद्ध करून रोगबीजाचा नाश केला पाहिजे.

*आरोग्यरक्षणासंबंधी कर हाजी नेणाऱ्या तारवाच्या मास्तरानें देणें.*

२८. हाजी नेणाऱ्या दरेक तारवाचा मास्तर तें ज्या ज्या बंदरास लागेल त्या त्या बंदरीं कायदेशीर अधिकाऱ्यानें बसविलेल्या आरोग्यरक्षणासंबंधी करांची सगळी रकम देण्यास बद्ध आहे.

## शिक्षा.

*हाजी नेणारें तारूं गैरकायदेशीर रीतीनें निघाल्याबद्दल किंवा त्यानें त्याप्रमाणें हाजी घेतल्याबद्दल मास्तरास किंवा मालकास शिक्षा.*

२९. (१) जर कोणतेंही हाजी नेणारें तारूं कलम ६, पोट-कलम (१), किंवा कलम ९, यांतील ठरावांविरुद्ध ब्रिटिश हिंदुस्थानांतील कोणत्याहि बंदराहून किंवा जागेहून सफरीवर निघेल किंवा जाईल, किंवा अशा बंदरीं किंवा जागीं उतारू उतरील, तर त्याचा मास्तर किंवा मालक यास, प्रसंगाप्रमाणें, त्या तारवांतून नेलेल्या किंवा सदरीलप्रमाणें उतरलेल्या दरेक उतारूबद्दल, पराकाष्ठा शंभर रुपयेंपर्यंत दंडाची किंवा पराकाष्ठा एक महिना पर्यंतच्या मुदतीच्या कैदेची शिक्षा होईल, किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

(२) जर कलम ६, पोट-कलम (२) यांतील ठरावांविरुद्ध कोणताही मनुष्य हाजी नेणाऱ्या तारवावर हाजीदाखल घेण्यांत येईल, तर मास्तर किंवा मालक हा, अशा दरेक हाजीबद्दल, पोट-कलम (१) यांत सांगितल्याप्रमाणें शिक्षेस पात्र होईल.

(३) सदरहू दोहोंपैकीं कोणत्याहि बाबतींत सदरहू तारूं ब्रिटिश हिंदुस्थानांतील कोणत्याही बंदरीं किंवा जागीं दोन वर्षांच्या आंत आढळेल, तर या आक्टाप्रमाणें ज्या शिक्षांस त्याचा मास्तर किंवा मालक पात्र झाला असेल त्या शिक्षांबद्दल या आक्टांतील ठरावांअन्वयें न्याय करण्यांत येईतोंपर्यंत, व या आक्टाअन्वयें त्यास केलेले दंड, सर्व खर्चासुद्धां, सदरहू ठरावांअन्वयें वसूल करण्यांत येत तोंपर्यंत, तें तारूं धरून अटकावून ठेवण्याचा कस्टमच्या कोणत्याही मुख्य अमलदारास अधिकार आहे.

मात्र असें ठरविण्यांत येतें कीं, या कलमाअन्वयें दिलेल्या कैदेच्या शिक्षेची एकंदर मुदत एका वर्षाहून जास्त असतां कामा नये.

हाजी नेणाऱ्या तारवावर जाण्यास किंवा त्याची पाहणी करण्यास हरकत करण्याबद्दल शिक्षा.

३०. जर कोणताही मनुष्य, तारवावर जाण्याविषयीं किंवा त्याची पाहणी करण्याविषयीं या आक्टावरून किंवा या आक्टाच्या आधारें अधिकार दिल्याप्रमाणें त्यावर जाण्यास किंवा त्याची पाहणी करण्यास अडथळा करील किंवा त्यावर जाऊं देण्याचें किंवा त्याची पाहणी करूं देण्याचें नाकारील, तर त्यास दरेक अपराधाबद्दल पांचशें रुपयेपर्यंत दंडाची शिक्षा होईल, किंवा तीन महिनेपर्यंतच्या मुदतीच्या कैदेची शिक्षा होईल, किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

दाखल्यांची नकल प्रदर्शित न केल्याबद्दल मास्तरास किंवा मालकास शिक्षा.

३१. हाजी नेणाऱ्या तारवाचा मास्तर किंवा मालक दाखल्यांच्या नकला लावून ठेवण्याबाबद १६ व्या कलमांत फर्माविल्याप्रमाणें करण्यास वाजवी सबबीवांचून—अशी सबब शाबीत करण्याचा बोजा त्याजवर राहील—चुकेल, तर त्यास दोनशें रुपयेपर्यंत दंडाची किंवा एक महिनापर्यंतच्या मुदतीच्या कैदेची शिक्षा होईल, किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

हाजींसंबंधी पत्रकांबाबद फर्माविल्याप्रमाणें न केल्याबद्दल व दुसऱ्या कित्येक गोष्टींबद्दल मास्तरास शिक्षा.

३२. जर हाजी नेणाऱ्या तारवाचा मास्तर, हाजींसंबंधी पत्रकांबाबद १९ व्या किंवा २० व्या कलमांत जें कांहीं फर्माविलें आहे त्यापैकीं कोणतीही बाबद करण्यास चुकेल, किंवा अशा कोणत्याही पत्रकांत किंवा पत्रकावर कोणताही खोटा मजकूर किंवा टिपण बुद्धया लिहील, किंवा वाजवी सबबीवांचून—अशी सबब शाबीत करण्याचा बोजा त्याजवर राहील—२१ व्या कलमांत सांगितल्या प्रकारचा कोणताही नवीन दाखला घेण्यास किंवा जादा हाजींच्या संख्येबाबद कोणतेंहि तशा प्रकारचें पत्रक करण्यास चुकेल, तर त्यास, अशा दरेक अपराधाबद्दल पांचशें रुपयेपर्यंत दंडाची शिक्षा होईल, किंवा तीन महिनेपर्यंतच्या मुदतीच्या कैदेची शिक्षा होईल, किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

दाखला घेतल्यावर हाजी नेणाऱ्या तारवांत कपटानें फेरफार केल्याबद्दल मास्तरास शिक्षा.

३३. जर हाजी नेणाऱ्या तारवाचा मास्तर, कलम ९ किंवा कलम २१ यांत सांगितलेल्या दाखल्यांपैकीं कोणताही दाखला घेतल्यावर, अशी कांहीं गोष्ट कपटानें करील किंवा करूं देईल कीं तिच्या योगानें तारवाची, तारवावरील हाजींची, किंवा ज्या इतर बाबतींसंबंधीं तो दाखला असेल त्या इतर बाबतींची स्थिति बदलली जाऊन त्या स्थितीस तो दाखला नालागू होईल, तर त्यास दोन हजार रुपयेपर्यंत दंडाची किंवा साहा महिनेपर्यंतच्या मुदतीच्या कैदेची शिक्षा होईल, किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

ठरविलेलें खुराकी सामान हाजींस देण्यास चुकल्याबद्दल मास्तरास शिक्षा.

३४. जर हाजी नेणाऱ्या तारवाचा मास्तर, कोणत्याही हाजीस, या आक्टाअन्वयें केलेल्या कानूंत ठरविलेल्या मोतादीप्रमाणें खुराकी सामान, सर्पण व पाणी देण्याचें वाजवी सबबीवांचून— अशी सबब शाबीत करण्याचा बोजा मास्तरावर राहील— वर्जील, तर त्यास, अशा वर्जनामुळें नुकसानी झालेल्या दरेक हाजीबद्दल वीस रुपयेपर्यंत दंडाची शिक्षा होईल.

ज्या संख्येपर्यंत हाजी नेण्याचा अधिकार असेल तिच्याहून जास्त हाजी नेण्याबद्दल मास्तरास व चालकास शिक्षा.

३५. हाजी नेणाऱ्या तारवावर असणाऱ्या हाजींची संख्या, या आक्टाअन्वयें हाजींची जी संख्या नेण्याचा अधिकार असेल तिच्याहून, जास्त किंवा तें तारूं निघाल्याच्या बंदरीं किंवा जागीं लैसेन्स किंवा दाखला दिलेला असल्यास त्या लैसेन्सावरून किंवा दाखल्यावरून जी संख्या नेण्याचा अधिकार असेल तिच्याहून जास्त असेल, तर मास्तर व मालक यांपैकीं दरेकास, सदरीलप्रमाणें अधिकार असलेल्या संख्येहून जास्त असणाऱ्या दरेक हाजीबद्दल वीस रुपयेपर्यंत दंडाची शिक्षा होईल.

हाजीनें ज्या जागीं उतरण्याचा करार केला असेल त्याखेरीज इतर जागीं त्यास उतरण्याबद्दल मास्तरास शिक्षा.

३६. जर हाजी नेणाऱ्या तारवाचा मास्तर, कोणत्याही हजीस, त्यानें ज्या बंदरीं किंवा जागीं उतरण्याचा करार केला असेल त्याखेरीज इतर कोणत्याही बंदरीं किंवा जागीं, त्याचें पूर्वी अनुमत घेतल्यावांचून किंवा कांहीं समुद्रसंबंधी धोक्यामुळें किंवा इतर अनिवार्य अपायामुळें तेथें उतरणें जरूर झाल्यावांचून, उतरील, तर त्यास अशा

दरेक अपराधाबद्दल दोनशें रुपयेपर्यंत दंडाची शिक्षा होईल, किंवा एक महिनापर्यंतच्या मुदतीच्या कैदेची शिक्षा होईल, किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

३७. जर हाजी नेणारें तारूं, त्यानें करावयाच्या सफरीबाबद व त्या सफरीस लागणाऱ्या वेळाबाबद हाजींबरोबर, प्रसिद्ध जाहिरात देऊन किंवा इतर रीतीनें, केलेला कोणताही स्पष्ट किंवा गर्भित करार किंवा कबुलायत याविरुद्ध, समुद्रसंबंधी धोक्यांखेरीज किंवा इतर अनिवार्य अपायाखेरीज दुसऱ्या कोणत्याही सबबीनें, कोणत्याही बंदरीं किंवा जागीं लागेल, तर त्याचा मास्तर व मालक यांपैकीं दरेकास पांचशें रुपयेपर्यंत दंडाची किंवा तीन महिनेपर्यंतच्या मुदतीच्या कैदेची शिक्षा होईल, किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

हाजींबरोबर केलेल्या कराराविरुद्ध सफर करण्याबद्दल मास्तरास व मालकास शिक्षा.

३८. जर हाजी नेणारें तारूं २२ व्या कलमांत फर्माविल्याप्रमाणें मुख्यत्वेंकरून वाफेच्या योगानें चालविलेलें नसेल, तर त्याचा मास्तर व मालक यांपैकीं दरेकास पांचशें रुपयेपर्यंत दंडाची किंवा तीन महिनेपर्यंतच्या मुदतीच्या कैदेची शिक्षा होईल, किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

मुख्यत्वेंकरून वाफेच्या योगानें न चालविलेल्या हाजी नेणाऱ्या तारवाच्या मास्तरास व मालकास शिक्षा.

३९. शंभरांहून जास्त हाजी नेणाऱ्या तारवावर, २३ व्या कलमांत फर्माविल्याप्रमाणें, एक वैद्यकीय अमलदार नसेल, किंवा नेलेल्या हाजींची संख्या एक हजारांहून जास्त असल्यास दोन वैद्यकीय अमलदार नसतील, तर त्याच्या मास्तरास पांचशें रुपयेपर्यंत दंडाची किंवा तीन महिनेपर्यंतच्या मुदतीच्या कैदेची शिक्षा होईल, किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

एका किंवा अधिक वैद्यकीय अमलदारांवांचून २३ व्या कलमाविरुद्ध हाजी नेणारें तारूं हकारल्याबद्दल मास्तरास शिक्षा.

४०. आदन खेरीज करून ब्रिटिश हिंदुस्थानांतील कोणत्याहि बंदराहून तांबड्या समुद्रामधील कोणत्याहि बंदरास हाजी घेऊन जाणाऱ्या तारवाचा मास्तर, वाजवी सबबीवांचून—अशी सबब शाबीत करण्याचा बोजा त्याजवर राहील—आदनास तारूं लावण्यास चुकेल, किंवा कलम २४, पोट-कलम (१), यांत फर्माविलेलें बिल आफ् हेल्थ घेतल्यावांचून तें बंदर सोडील, तर त्यास, अशा दरेक अपराधाबद्दल, दोन हजार रुपयेपर्यंत दंडाची किंवा सहा महिनेपर्यंतच्या मुदतीच्या कैदेची शिक्षा होईल, किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

जाल्या सफरींत आदन येथें बिल आफ् हेल्थ न घेतल्याबद्दल मास्तरास शिक्षा.

४१. जर हाजी नेणाऱ्या तारवाचा मास्तर, २७ व्या कलमाच्या ठरावांविरुद्ध कोणताहि हाजी किंवा कोणतीही संपर्कानें दूषित झालेली जिन्नस जाणूनबुजून तारवावर घेईल, तरत्यास याप्रमाणें घेतलेल्या दरेक हाजीबद्दल पांचशें रुपयेपर्यंत, किंवा अशा दरेक दूषित जिनसेबद्दल पन्नास रुपयेपर्यंत, दंडाची शिक्षा होईल, किंवा तीन महिनेपर्यंतच्या मुदतीच्या कैदेची शिक्षा होईल, किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

कलम २७ विरुद्ध हाजी किंवा संपर्कानें दूषित झालेली जिन्नस घेणाऱ्या मास्तरास शिक्षा.

४२. हाजी नेणाऱ्या तारवाचा मास्तर किंवा असल्यास वैद्यकीय अमलदार हा, या आक्टाअन्वयें केलेली कोणतीहि कानू वाजवी सबबीवांचून—अशी सबब शाबीत करण्याचा बोजा त्याजवर राहील—तोडील, किंवा पाळण्याची वर्जील किंवा हयगय करील, तर त्याला पांचशें रुपयेपर्यंत दंडाची किंवा तीन महिनेपर्यंतच्या मुदतीच्या कैदेची शिक्षा होईल, किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

हाजी नेणाऱ्या तारवाचा मास्तर किंवा वैद्यकीय अमलदार यास या आक्टाअन्वयें केलेल्या कानू न पाळण्याबद्दल शिक्षा.

## काम चालविण्याची रीति.

४३. (१) या आक्टाविरुद्ध होणाऱ्या अपराधांबद्दल शिक्षा करण्याचा माजिस्ट्रेटास अधिकार आहे.

अपराध ठरविणें, व हाजी नेणारें तारूं जप्त करून दंड वसूल करणें.

(२) ज्या मनुष्यास या आक्टाअन्वयें कोणताही दंड केला असेल तो मनुष्य हाजी नेणाऱ्या तारवाचा मास्तर किंवा मालक असून, जर असा दंड, तो देण्याबाबदच्या हुकुमांत सांगितलेल्या वेळीं व रीतीनें देण्यांत आला नाहीं, तर माजिस्ट्रेटास, पैसा वसूल करण्याविषयीं कायद्यांत नेहमीचे जे उपाय सांगितले असतील त्यांखेरीज आणखी, असें

हाजी नेणारें तारूं, त्याचीं दोरखंडें, सामान व बावटे वगैरे हीं जप्त करून व विकून, देण्याची राहिलेली रकम वसूल करण्याविषयीं वारंट देऊन हुकूम करण्याचा अधिकार आहे.

हुकुमत.

४४. या आक्टाअन्वयें सांगितलेल्या शिक्षा ठरविण्याच्या कारणासाठीं, त्यांतील ठरावांविरुद्ध केलेला दरेक अपराध, अपराधी ज्या जागीं मिळाला असेल त्या जागेच्या माजिस्ट्रेटाच्या हुकुमतीच्या हद्दींत केला आहे असें समजलें पाहिजे.

शिक्षा होण्याबद्दल काम चालविण्याला अधिकार.

४५. हाजी नेणाऱ्या तारवांचे मास्तर व मालक ज्या शिक्षांस या आक्टावरून पात्र होतात त्या शिक्षा, या आक्टाअन्वयें दाखले देण्यास नेमलेल्या अमलदाराच्या सांगण्यावरून, किंवा ज्या कोणत्याही बंदरीं किंवा जागीं सदरहू प्रकारचा अमलदार नसेल तेथें कस्टमच्या मुख्य अमलदाराच्या सांगण्यावरून फिर्याद झाली असतां मात्र अमलांत आणावयाच्या असें समजावें.

दंडांचा विनियोग.

४६. या आक्टाअन्वयें दंड करणाऱ्या माजिस्ट्रेटास, त्याला योग्य वाटेल तर, तो सर्व दंड किंवा त्याचा कोणताही भाग, ज्या कृत्याबाबद किंवा कसुरीबाबद हा दंड केला असेल त्या कृत्यामुळें किंवा कसुरीमुळें कोणत्याही मनुष्याची झालेली कोणतीही नुकसानी भरून देण्यामध्यें किंवा भरून देण्याकडे किंवा फिर्यादीचा खर्च देण्यामध्यें किंवा देण्याकडे लावण्याविषयीं फर्माविण्याचा अधिकार आहे.

गैरहजर साक्षीदारांच्या जबान्या.

४७. (१) या आक्टाअन्वयें कोणतेंही कायद्यासंबंधी काम चालत असतांना, जेव्हां त्या कामाच्या विषयासंबंधीं कोणत्याही साक्षीदाराची साक्ष पाहिजे लागेल तेव्हां, त्याच विषयासंबंधीं त्या साक्षीदारानें, मक्किा माआझमांच्या राज्यांतील (जेथें सदरहू काम चाललें असेल तें बंदर किंवा जागा ज्या स्थानिक सरकारच्या ताब्यांत असेल त्याच स्थानिक सरकारच्या ताब्यांत असणाऱ्या भागांखेरीज हिंदुस्थानचे इतर सर्व भाग धरून) कोणत्याही जस्टिसपुढें किंवा माजिस्ट्रेटापुढें, किंवा इतर ठिकाणीं कोणत्याही ब्रिटिश कान्सुलर आफिसरापुढें, पूर्वीं कोणतीही जबानी दिली असेल ती, सदरहू काम ज्या कोर्टांत चाललें असेल त्या कोर्टाच्या अधिकाराच्या हद्दींत सदरहू साक्षीदार मिळत नाहीं असें शाबीत करण्यांत आलें असतां, पुराव्यास घेतां येईल.

मात्र असें ठरविण्यांत येतें कीं—

(अ) सदरहू जबानीवर सदरहू जस्टिसची, माजिस्ट्रेटाची किंवा कान्सुलर आफिसराची सही असल्यावांचून;

(ब) ती जबानी आरोपित मनुष्यासमक्ष झालेली असल्यावांचून; आणि

(क) ती याप्रमाणें झाली आहे असा दाखला सदरहू जस्टिसानें, माजिस्ट्रेटानें किंवा कान्सुलर आफिसरानें दिलेला असल्यावांचून;

ती पुराव्यास घेतां येणार नाहीं.

(२) सदरहू प्रकारच्या कोणत्याही जबानीवर ज्या मनुष्यानें सही केलेली दिसत असेल, त्या मनुष्याची सही किंवा हुद्दा कोणत्याही प्रसंगीं शाबीत करणें जरूर नाहीं; आणि कोणत्याही फौजदारी कामांत सदरीं सांगितलेला दाखला हा, उलट शाबिती करण्यांत आली नाहीं तर, त्या दाखल्यांत लिहिल्याप्रमाणें आरोपित हजर असल्याविषयीं पुरता पुरावा आहे असें समजावें.

## पुरवणी ठराव.

हाजी तारवावर चढण्याच्या व ते तारवावरून उतरण्याच्या बंदरांस माहिती पाठविणें.

४८. (१) हाजी नेणारें तारूं ब्रिटिश हिंदुस्थानांतील ज्या कोणत्याही बंदरीं किंवा जागीं लागेल किंवा येईल त्या बंदरांतील किंवा जागेंतील कस्टमच्या मुख्य अमलदारानें, किंवा त्या ठिकाणीं त्या कामासाठीं स्थानिक सरकारानें दुसरा अमलदार नेमलेला

असल्यास त्यानें, अशा हाजी नेणाऱ्या तारवाविषयीं व त्यांतील हाजींविषयीं त्यास अगत्याचा वाटेल तसा कोणताही तपशील, ज्या बंदराहून किंवा जागेहून त्या तारवानें आपली सफर सुरू केली असेल त्या बंदरांतील किंवा जागेंतील अमलदारास, आणि ब्रिटिश हिंदुस्थानांतील ज्या दुसऱ्या कोणत्याही बंदरीं किंवा जागीं सदरील हाजी किंवा त्यांपैकीं कोणतेही हाजी त्या तारवावर चढले असतील किंवा त्यावरून उतरावयाचे असतील त्या बंदरांतील किंवा जागेंतील अमलदारास, या आक्टाच्या ठरावांकडे लक्ष पुरवून, पाठविला पाहिजे.

(२) हाजी नेणारें तारूं ब्रिटिश हिंदुस्थानांतील ज्या कोणत्याही बंदरीं किंवा जागीं लागेल किंवा येईल त्या बंदरांतील किंवा जागेंतील कस्टमच्या मुख्य अमलदारास, किंवा त्या ठिकाणीं त्या कामासाठीं स्थानिक सरकारानें दुसरा कोणी अमलदार नेमलेला असल्यास त्यास, हाजींच्या संख्येबाबदच्या व इतर गोष्टींबाबदच्या या आक्टांतील ठरावांप्रमाणें वहिवाट झाली आहे किंवा कसें हें पाहण्यासाठीं त्या तारवावर जाऊन त्याची पाहणी करण्याचा अधिकार आहे.

कान्सलचा रिपोर्ट.

४९. ज्या कोणत्याही शिक्षेस या आक्टाअन्वयें कोणी पात्र झाला असेल ती ठरविण्यासाठीं चाललेल्या कोणत्याही कामांत, सदरील शेवटच्या कलमाचें पोटकलम (१) यामध्यें सांगितल्या प्रकारच्या तपशिलाचा रिपोर्ट ह्मणून असणारा कोणताही दस्तऐवज, किंवा कोणत्याही इन्साफाच्या कोर्टांत चाललेल्या कामाची योग्य रीतीनें सही केलेली नकल, आणि त्याप्रमाणेंच कोणत्याही परमुलुकाच्या बंदरांत मलिका मोअझमांच्या वतीनें कान्सलचा अधिकार कायदेशीर रीतीनें चालविणाऱ्या कोणत्याही मनुष्यानें करून सही केलेला ह्मणून असणारा तशाच प्रकारचा कोणताही दस्तऐवज, हे कागद, ज्या जागीं या आक्टाअन्वयें काम चाललें असेल त्या जागेंतील किंवा त्या जागेजवळील कोणत्याही अमलदाराकडे ते सरकारी नात्यानें पाठविण्यांत आले आहेत असें दिसून येईल, तर पुराव्यास घेतले पाहिजेत.

गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल व स्थानिक सरकार यांस कानू करण्याचा अधिकार.

५०. (१) गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांस, खालीं लिहिलेल्या सर्व गोष्टींबाबद किंवा त्यांपैकीं कोणत्याही गोष्टींबाबद नियमन करण्यासाठीं या आक्टास अनुसरून असणाऱ्या कानू करण्याचा अधिकार आहे. त्या गोष्टी येणेंप्रमाणें:—

(अ) हाजी नेणाऱ्या तारवावरील हाजींस ज्या मानानें खुराकी सामान, सर्पण व पाणी द्यावयाचें तें मान, आणि त्या खुराकी सामानाची, सर्पणाची व पाण्याची प्रत;

(ब) आरोग्य, स्वच्छता व लज्जा राखण्यासाठीं ज्या औषधसंग्रहाची व इतर साधनांची आणि सोईची तारवावर तजवीज करावयाची त्या;

(क) ज्या बाबतींत वैद्यकीय अमलदार घेण्याविषयीं या आक्टांत सांगितलें असेल त्या बाबतींत त्यांस लैसेन्स देणें व नेमणें;

(ड) तारवावर बोटी, नांगर, सांखळा व दोर घ्यावयाचे ते;

(इ) नौका चालविण्याच्या कारणांसाठीं लागणाऱ्या यंत्रांचा पुरवठा करावयाचा तो;

(फ) तारवावर आग लागली असतां ती विझविण्यासाठीं लागणारी यंत्रसामग्री व त्यावर आग लागूं नये यासाठीं पूर्वीं करण्याच्या तजविजी;

(ग) जीव बचावण्याबद्दलच्या यंत्रांचा व संकटाबाबद निशाण्या करण्याबद्दलच्या साधनांचा, आणि पाण्यांत न विझणाऱ्या व लाइफबोय यांस लावण्याची सोय केलेली आहे अशा दिव्यांचा पुरवठा;

(इ) सफरीमध्यें मास्तराचीं, एक किंवा अधिक वैद्यकीय अमलदार असल्यास त्याचीं किंवा त्यांचीं आणि इतर अमलदारांचीं कामें ; आणि,

(आय्) सामान्यतः, या आक्टाचे हेतु सिद्धीस नेणें.

(२) स्थानिक सरकारास, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांची अगोदर मंजुरी घेऊन, खालीं लिहिलेल्या गोष्टींबाबद नियमन करण्यासाठीं या आक्टास अनुसरून असणाऱ्या कानू करण्याचा अधिकार आहे. त्या गोष्टी येणेंप्रमाणें:—

(अ) हाजी तारवावर चढविण्यासाठीं किंवा त्यावरून उतरण्यासाठीं या आक्टाअन्वयें नेमलेल्या कोणत्याही बंदरीं किंवा जागीं, कोणत्या स्थलसीमेच्या आंत, आणि कोणत्या वेळीं व कोणत्या रीतीनें हाजी तारवावर चढवावयाचे किंवा त्यावरून उतरावयाचे तें; आणि

(ब) हाजी नेणाऱ्या तारवावर हाजी घेण्यास सुरुवात केल्यानंतर त्या तारवानें किती वेळाच्या आंत आपल्या सफरीवर निघालें पाहिजे किंवा गेलें पाहिजे तें.

(३) या कलमाअन्वयें कोणतीही कानू करतांना, ती करणाऱ्या अधिकाऱ्यास, अशा कानूचें उल्लंघन केल्याबद्दल दोनशें रुपयेपर्यंत दंडाची शिक्षा होईल असें, आणि असें उल्लंघन एकसारखें चालू राहील तेव्हां पहिल्या दिवसानंतर तें चालू असेल तशा दरेक दिवसाबद्दल आणखी वीस रुपयेपर्यंत दंडाची शिक्षा होईल असें फर्माविण्याचा अधिकार आहे.

(४) या कलमाअन्वयें कानू करण्याचा अधिकार दिला आहे तो, त्या कानू अगोदर प्रसिद्ध करून मग कायम करावयाच्या अशा अटीनें दिला आहे असें समजावें.

(५) सन १८८७ चा देशी उतारू नेणाऱ्या तारवांबाबद आक्ट याअन्वयें आजपर्यंत केलेल्या सर्व कानू या आक्टाअन्वयें केलेल्या कानूंवरून रद्द करण्यांत किंवा बदलण्यांत आल्याखेरीज व येत तोंपर्यंत त्या सर्व, या आक्टास अनुसरून असतील तेथवर, हाजी नेणाऱ्या तारवांस लागू राहतील.

अमलदारांची नेमणूक.

६१. या आक्टांत दिलेले किंवा त्याअन्वयें देण्यांत येतील ते अधिकार चालविण्यासाठीं, आणि या आक्टांत सोंपलेलीं किंवा त्याअन्वयें सोंपण्यांत येतील तीं कामें करण्यासाठीं, स्थानिक सरकारानें आपणास योग्य वाटतील त्या मनुष्यांस नेमलें पाहिजे.

---

## हेतु व कारणें यांचें निरूपण.

प्रस्तुत मसुद्याचा उद्देश, सन १८९४ सालीं पारिस मुक्कामीं निरनिराळ्या राष्ट्रांच्या प्रतिनिधींची आरोग्यरक्षणासंबंधीं विचार करण्याकरितां एक सभा भरली होती तिनें, ब्रिटिश हिंदुस्थान व आरबस्थान यांच्या दर्म्यान जलमार्गानें हाजी नेण्याआणण्याच्या संबंधानें बंदोबस्त करण्यासाठीं ज्या शिफारसी केल्या आहेत व ज्या मलिका मआझमांच्या सरकारास मान्य आहेत त्या अमलांत आणाव्या, हा आहे. या कामीं लावलेलीं जहाजें हल्लीं, सन १८८७ चा देशी उतारू नेणाऱ्या तारवांबाबद आक्ट याच्या अमलाखालीं आहेत; परंतु ज्याअर्थीं त्या आक्टांत, हाजी नेणाऱ्या तारवांस लागू असणारे विशेष ठराव असून आणखी, एशिया किंवा आफ्रिका खंडाचीं असणाऱ्या मनुष्यांस उतारूंदाखल नेणाऱ्या तारवांस सामान्यतः लागू असणारे ठरावही आहेत, त्याअर्थीं तो आक्ट प्रस्तुतच्या विशेष प्रकरणीं लागू पडे अशा रीतीनें तो सुधारण्याविषयीं प्रयत्न करण्याच्या बदला, हाजी नेणारीं तारवें त्याच्या अमलांतून अजीबात काढून त्यांच्या बंदोबस्ताबद्दल हल्लीं योजिला आहे तशा प्रकारचा निराळा कायदा करणें हें फारच सोईचें आहे असें दिसतें. या मसुद्याच्या रकान्यांत दिलेल्या हवाल्यांवरून असें दिसून येईल कीं त्यांत, सन १८८७ च्या १० व्या आक्टांतील १८, १९, २०, २१, ३७, ६९ व ९७ या कलमांखेरीज बाकीचीं सर्व कलमें उतरून घेऊन त्यांमध्यें, वर सांगितलेला उद्देश सिद्धीस जाण्यास जरूर असणाऱ्या सुधारणा केल्या आहेत. वर सांगितल्याप्रमाणें जीं कलमें वगळलीं आहेत त्यांपैकीं कांहीं ब्रिटिश हिंदुस्थानांतून तांबड्या समुद्रामधील परमुलुकांच्या बंदरांस मोठी सफर करण्याऱ्या तार-

वांस लागू होत नाहींत हें सकृत् दर्शनींच दिसून येण्यासारखें आहे. वरीलप्रमाणें हल्लींच्या कायद्याच्या ठरावांमध्यें केलेल्या सुधारणांपैकीं विशेष महत्त्वाच्या सुधारणांविषयीं खालीं विचार केला आहे.

२. मसुद्याच्या ४ थ्या कलमावरून, देशी उतारू नेणाऱ्या तारवांबाबदचा आक्ट "हाजी नेणाऱ्या तारवांच्या" संबंधापुरता रद्द केला आहे, आणि ९ व्या कलमांत "हाजी" व "हाजी नेणारें तारूं" यांच्या व्याख्या दिलेल्या असून आणखी, कोणतेंही तारूं योजिलेल्या आक्टाच्या अमलाखालीं येणार नाहीं असें ठरविलें आहे, मात्र त्यावर अगदीं खालच्या वर्गाचे नाहींत असे हाजी धरून साधारण उतारू असून त्याखेरीज, त्याच्या एकंदर बारदानांपैकीं दर शंभर टनाला निदान एक या प्रमाणानें अगदीं खालच्या वर्गाचे हाजी असतां कामा नये. सदरहू सभेनें केलेल्या करारनाम्याच्या अटींप्रमाणें, हेजाझला किंवा हेजाझपासून सफर करणारा कोणत्याही वयाचा दरेक मुसलमान उतारू हा हाजीदाखल मानला पाहिजे.

३. मसुद्याच्या ७ व्या कलमांत, हाजी नेणारें तारूं हकारण्याची व त्याच्या अखेर जाण्याच्या ठिकाणाची सूचना (चोवीस तासांच्या बदला) निदान तीन दिवस अगोदर दिली पाहिजे असें ठरविलें आहे.

४. सन १८८७ च्या १० व्या आक्टाच्या २१ व्या कलमांत, मोठ्या सफरींमध्यें उतारूंस मिळण्यासारखी कमींत कमी किती जागा असली पाहिजे हें ठरविलें आहे, आणि असा ठराव अगोदर केलेला असतांही पुढें ५६ व्या कलमांत गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांस, त्यांकरितां किती चौरस किंवा किती घन फूट जागा असली पाहिजे हें हुकूम फर्मावून ठरविण्याचा अधिकार दिला आहे. मसुद्याच्या १८ व्या कलमाचें पोट-कलम (१) यांत सदरहू दोन ठरावांपैकीं पहिला गाळून दुसरा दाखल केला आहे, कारण सदरहू सभेमध्यें जागा वाढविण्याबद्दल बराच अभिप्राय पडून, त्याबाबदचा ठराव सदरहूप्रमाणें हुकूम फर्मावून करावा असें ठरलें आहे. त्या कलमाचीं बाकी पोट-कलमें (२) व (३) यांमध्यें, दिवसास व रात्रीं हाजींच्या उपयोगासाठीं वरचा डेक राखून ठेवणें व त्यांच्या हितार्थ इस्पितळाच्या सोईकरितां जागा निराळी ठेवणें यांबाबद सदरहू सभेनें केलेल्या शिफारसींप्रमाणें ठराव केले आहेत.

५. मसुद्याच्या २३ व्या कलमावरून, हाजींची संख्या एक हजारांवर असल्यास तारवावर दुसरा एक वैद्यकीय अमलदार असणें जरूर आहे असें सदरहू करारनाम्यांत सांगितल्याप्रमाणें ठरविलें आहे, व त्या कलमांतील बाकीचा मजकूर, देशी उतारू नेण्याऱ्या तारवांबाबदच्या आक्टाच्या २६ व्या कलमाचा उतारा आहे.

६. मसुद्याचें कलम २४ हें, देशी उतारू नेणाऱ्या तारवांबाबदच्या आक्टाच्या २७ व्या कलमाचा उतारा असून त्यांत, हिंदुस्थानास परत येतांना तारवानें भादन येथें लागणें अवश्य असल्याबद्दल हल्लीं ठराव आहे तो जरूरीचा नसून त्यामुळें वारंवार गैरसोई होते, ह्मणून त्याप्रमाणें तारवानें लागणें अवश्य नाहीं हें दर्शविण्यापुरता फेरफार केला आहे. हा फेरफार करण्याविषयीं सदरहू करारनाम्यांत सांगितलेलं नाहीं, परंतु तो कोणत्याही प्रकारें त्या करारनाम्याविरुद्ध नाहीं.

७. मसुद्याचें कलम २७ हें देशी उतारू नेणाऱ्या तारवांबाबदच्या आक्टाच्या ३० व्या कलमाशीं मिळतें असून त्यांत, सदरहू सभेनें शिफारस केल्याप्रमाणें, असें ठरविलें आहे कीं, तारवावर चढण्यापूर्वीं जमिनीवर सर्व हाजींची वैद्यकीय तपासणी झाली पाहिजे, पटकीचा वाखा किंवा पटकीच्या वाख्याच्या स्वरूपाची हगवण किंवा कोणताही भयंकर प्रकारचा सांक्रामिक किंवा स्पर्शजन्य रोग झालेल्या मनुष्यांस तारवावर चढण्याची परवानगी देतां कामा नये, याप्रमाणें विकार झालेल्या मनुष्यांच्या तैनातींत जीं मनुष्यें असतील किंवा ज्यांस इतर रीतीनें त्यांचा संपर्क झालेला असेल त्यांस, योग्य रीतीनें नेमलेल्या वैद्यकीय अमलदाराच्या नजरेस आल्यास, तारवावर चढण्याची मनाई करण्याचा अधिकार आहे, आणि संपर्कानें दूषित झालेल्या जिनसा सदरील प्रकारच्या वैद्यकीय अमलदाराच्या देखरेखीखालीं अगोदर शुद्ध करण्यांत आल्यावांचून तारवावर घेतां कामा नये.

८. मसुद्याचें कलम २८ हें अगदीं नवें असून तें सदरहू करारनाम्याच्या आधारानें केलेलें आहे, व त्यांतील मजकूर, तारूं लागेल त्या त्या बंदरीं ध्यावयाचे आरोग्यरक्षणासंबंधी सर्व कर तारवाच्या मास्तरानें दिले पाहिजेत, असा आहे. ही रकम, हाजींस द्यावयाच्या तिकिटांच्या किंमतींत सामील होण्याबद्दल तजवीज करून, किंवा इतर रीतीनें, संबंध असणाऱ्या हाजींकडून वसूल करण्याची मास्तरास मोकळीक आहे.

९. बाकी केलेल्या फेरफारांपैकीं कांहीं, वर खुलासा केलेल्या फेरफारांच्या अनुरोधानें करावे लागले आहेत, व कांहीं विशेष महत्त्वाचे नाहींत, सबब त्यांचा जास्त विचार किंवा खुलासा करणें जरूर नाहीं.

तारीख ९ माहे जुलै सन १८९५. ए. मेकन्झी.

(True Translation)

M. A. BAIG,
Oriental Translator to Government.

## दिवाणी काम चालविण्याच्या रीतीविषयीं कायद्याचीं कलमें ६३२ व ६५२ हीं सुधारण्यासाठींच्या आक्टाचा मसुदा.

ज्या अर्थीं दिवाणी काम चालविण्याच्या रीतीविषयीं कायद्याचीं कलमें ६३२ व ६५२ हीं सुधारणें इष्ट आहे, त्या अर्थीं ह्यावरून खालीं लिहिल्याप्रमाणें ठरविण्यांत येत आहे:—

सन १८८२ चा आक्ट १४ वा, ह्याच्या ६३२ व्या कलमाची सुधारणा.

१. सदरहू कायद्याच्या ६३२ व्या कलमांत, "या बाबेंत" ह्या शब्दांनंतर, "व ६५२ व्या कलमांत" हा मजकुर दाखल करावा.

सन १८८२ चा आक्ट १४ वा, ह्याच्या ६५२ व्या कलमाची सुधारणा.

२. सदरहू कायद्याच्या ६५२ व्या कलमांत खालील मजकुर जास्त दाखल करावा; तो येणेंप्रमाणें:—

"ह्या कायद्यांत कोणताही ठराव असला तरी, हिंदुस्थानांत न्यायाधिकारी हे कोर्टें स्थापन करण्याबाबतच्या आक्टाअन्वयें स्थापिलेल्या कोणत्याही है कोर्टास, आपला अवल दिवाणी अधिकार चालवितांना आपलें काम ज्या रीतीनें चालवावयाचें त्या रीतीचें नियमन करण्यासाठीं, आपल्यास योग्य वाटतील तसे व ज्या लेटर्स पेटंटअन्वयें त्याची स्थापना झाली असेल त्या लेटर्स पेटंटास जुळते असे नियम करण्याचा अधिकार आहे.

"असे सर्व नियम स्थानिक सरकारी गॅझेटांत प्रसिद्ध केले पाहिजेत आणि मग त्यांचा अमल कायद्याप्रमाणें होईल".

---

### हेतु व कारणें ह्यांचें निरूपण.

दिवाणी काम चालविण्याच्या रीतीविषयीं कायदा ह्याचें ६५२ वें कलम आतां आहे त्यावरून पाहातां असें ठरविलेलें दिसतें कीं, कोणतेंही है कोर्ट रॉयल चार्टरअन्वयें स्थापन झालेलें असलें तरी, त्या कोर्टानें आपलें काम चालविण्याच्या रीतीचें नियमन करण्यासाठीं केलेले सर्व नियम त्या कायद्यास जुळते असले पाहिजेत. परंतु, कलकत्ता, मद्रास व मुंबई येथील है कोर्टांच्या लेटर्स पेटंटांमध्यें, अशा है कोर्टांनीं आपल्यास जरूर लागेल त्याप्रमाणें साधारण कायद्याचे ठराव बदलून लागू करावे ह्यासाठीं त्यांस कांहीं सवड देण्याची व्यावहारिक युक्तता कबूल केलेली आहे असें दिसतें.

सदरहू ठराव, सदरहू कोर्टांमध्यें चालू असलेल्या अवल कामाच्या बाबतींत सर्व प्रकारीं सोईचे पडत नाहींत असें अनुभवावरून समजून आलें आहे; आणि ह्या मसुद्याचा उद्देश असा आहे कीं, सदरहू कायदा सदरहू सनदांच्या ठरावांशीं अगदीं जुळता व्हावा आणि सदरीं उल्लेख केलेल्या है कोर्टांना, त्यांची अवल दिवाणी हुकुमत चालविण्याच्या कामाचें नियमन सदरहूप्रमाणें करतां यावें, अशा रीतीनें सदरहू कायद्याच्या ६५२ व्या कलमाची एक सुधारणा करावी आणि त्या सुधारणेंमुळें ६३२ व्या कलमाची सुधारणा करावी लागते तीही करावी.

तारीख ९ जुलई १८९५.

ए. इ. मिलर.

(True Translation.)

M. A. BAIG,
Oriental Translator to Government.

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.